## 'म नो ग त'

"संत बहिणाबाईंच्या अभंगवाणीचे विशेष" हा विषय एम्.फिल. च्या शोध प्रबंधिकेसाठी निवडण्यामागे मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) तसेच मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून विषय निश्चित केला गेला आहे.

माझे पणजोबा सिदूबुवा हे वारकरी होते. योगायोगाने त्यांचे देहावसान तुकारामबीजेदिवशी झाले. त्यामुळे 1938 सालापासून आजपर्यंत तुकारामबीजेचा कार्यक्रम केला जातो. त्यादिवशी किर्तनाचासुध्दा कार्यक्रम होत असतो. त्यामुळे माझ्या मनामध्ये लहानपणापासून वारकरी संप्रदायाबद्दल ओढ होती. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथे 1992–93 साली एम्.ए. च्या वर्गामध्ये शिकत असताना एका लेखकाचा अभ्यास (ज्ञानेश्वर) हा पेपर डॉ. कन्हैया कुंदप शिकवत होते. व्याख्यानाच्यावेळी 'ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया' हा अभंग कोणाचा आहे. याचा लेखक कोण ? असा प्रश्न सहज जाताजाता त्यांनी विचारला. या प्रश्नाच्या उत्तराचा मी शोध घेतला आणि मला संत बहिणाबाईंचे चरित्र वाचावयास मिळाले. याचवेळी 400 वर्षाच्या संतपरंपरेचा इतिहास एका अभंगाद्वारे मांडणाऱ्या संत कवयित्रीबद्दल अभ्यास करावा असे मनामध्ये विचार येऊ लागले आणि एम्.फिल. मुळे या संत कवयित्रीचा अभ्यास करण्याची संधी मला मिळाली. मी या संत कवयित्रीवर डॉ. कन्हैया कुंदप यांच्या सल्ल्यावरून हा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तेराव्या शतकापासून बहिणाबाई कालापर्यंत अनेक संत कवयित्री होऊन गेल्या आहेत. त्या संत कवयित्रींचा अभ्यासही झाला आहे. पण संत बहिणाबाई या पहिल्या संत आत्मचरित्रकार आहेत. त्यांच्या शैलीचे विशेष या अभ्यासामध्ये समाविष्ट आहेत. समकालीन तुकाराम शिष्य आणि बहिणाबाईंचा सविस्तर अभ्यास केला आहे.

संत बहिणाबाईंच्या चरित्राचा आणि गुरूपरंपरेचा अभ्यास त्यांच्या अभंगाद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या आत्मनिवेदनपर, निर्याणपर अभंगाचे विशेष अभ्यासामध्ये समाविष्ट केले आहेत. तसेच त्यांनी वापरलेल्या प्रतिमा, शैली यांचे विशेष याचाही समावेश या अभ्यासामध्ये केला आहे.

या प्रबंधिकेचा विषय निवडण्यापासून ते या प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत माझे आदरणीय गुरू आणि या प्रबंधिकेचे माननीय मार्गदर्शक डॉ. कन्हैया बाबुराव कुंदप–प्रपाठक व मराठी विभागप्रमुख, सद्गुरू गाडगे

महाराज कॉलेज, कराड यांनी केलेल्या अत्यंत मौलिक मार्गदर्शनामुळे आणि स्वतः केलेल्या परिश्रमामुळे, सहकार्यामुळे, वेळोवेळी प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे ही प्रबंधिका पूर्ण होऊ शकली. मी त्यांचा ऋणी आहे.

एम्.फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य, ई.जी. निकम, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांचे ऋण मला कधीही न फिटण्यासारखे आहे.

तसेच प्रा.सौ.सरलादेवी ई. निकम, डॉ.श्रीमती सुमन पाटील, प्रा.सौ. सूर्यमाला जाधव, प्रा.सौ.एस्.डी. रैनाक, प्रा.बी.पी. पाटील, कै. प्रा.बी.आर. बोळाज, स.गा.म. कॉलेज, कराड (ज्युनियर कॉलेज) चे मराठी विभागाचे सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

तसेच मला एम्.फिल. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी माझी मानसिक तयारी करणारे व प्रेरणा देणारे माझे मातापिता सौ. सुलोचना आणि रामचंद्र हरी नलवडे यांचाही ऋणनिर्देश करणे गरजेचे आहे.

एम्.फिल. ची प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी आवश्यक महत्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्याचे काम सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजचे ग्रंथालय, कराड नगरपालिका ग्रंथालय यांनी केले. या दोन्ही ग्रंथपालांचा व त्यांच्या सहकारी मित्रांचा मी ऋणी आहे.

एम्.फिल. प्रबंधिका टंकलिखित करण्याचे काम 'ॲक्युरेट शॉर्टहॅण्ड ॲण्ड टाईपरायटिंग इन्स्टिटयूट' चे संचालक श्री. सुरेश कळेकर व सौ. तृप्ती कळेकर यांचाही मी ऋणी आहे.

यापुढेही असेच मला आपले सहकार्य मिळावे अशी आशा बाळगतो.

**प्रदीपकुमार रामचंद्र नलवडे**

* * *

# प्र स्ता व ना

संत बहिणाबाईंच्या अभंगवाणीचा अभ्यास करत असताना काही गोष्टींच्याकडे विशेष लक्ष दिले गेलेले आहे. त्या पुढीलप्रमाणे –

बाराव्या शतकापासून बहिणाबाईंच्या काळापर्यंत अनेक संत कवयित्री होऊन गेल्या. त्यामध्ये मध्ययुगीन कालखंडातील कवयित्रींच्यापेक्षा संत बहिणाबाईंचे काव्य कसे वेगळे आहे. तसेच त्यांचे वाड.मयीन आणि लौकिक चरित्र इतर संतकवयित्रीपेक्षा कसे वेगळे आहे याचा विचार प्रामुख्याने केलेला आहे. त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगाची चर्चा केली आहे.

तुकारामांच्या प्रभावळीतील संतकवी, कवयित्री आणि बहिणाबाई यांचा अभ्यास मी केला आहे. तुकारामांच्या प्रभावळीतील इतर तुकाराम शिष्य आणि बहिणाबाई यांच्यामध्ये कोणता फरक होता याचा अभ्यास केला आहे. तुकाराम महाराजांच्या गुरूपदेशामुळे बहिणाबाईंच्या जीवनामध्ये कसे परिवर्तन झाले याची चर्चा केलेली आहे.

संत बहिणाबाईंचे जीवनचरित्र कसकसे घडत गेले? त्यांना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले? तसेच त्यांचे वाड.मयीन व्यक्तिमत्व कसे घडत गेले याचा उहापोह त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगाद्वारे केलेला आहे. तसेच त्यांची गुरूपरंपरा याचाही विचार केला आहे.

संत बहिणाबाईंनी काव्यरचना केली. त्या काव्यामध्ये कोणकोणत्या विषयांची चर्चा त्यांनी केली आहे, त्या विषयांचे स्थूलमानाने वर्गीकरण करून त्याचा विचार केला आहे. बहिणाबाईंच्या काव्यावर कोणकोणत्या संतकवींच्या काव्याचा प्रभाव आहे त्याचीही चर्चा केली आहे.

संत बहिणाबाईंची जीवनदृष्टि तसेच त्यांचे आत्मनिवेदनपर अभंग आणि निर्याणपर अभंग यांची विशेष साधकबाधक चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

संत बहिणाबाईंनी आपले काव्य परिणामकारक होण्यासाठी कोणत्या प्रतिमा वापरल्या आहेत. तसेच त्यांच्या शैली विशेषांची चर्चा केली आहे.

परिशिष्टामध्ये बहिणाबाईंच्या गाथ्यातील काही महत्वाचे अभंग दिले आहेत. बहिणाबाईंची पत्रिका

वंशवृक्ष दिला आहे. बहिणाबाईंच्या साहित्यावर झालेल्या चित्रपटाची माहिती दिली आहे. बहिणाबाईंची पुण्यतिथी, महोत्सव, दिंडया यांची माहिती दिली आहे.

प्रबंधिकेच्याशेवटी संदर्भग्रंथाची सूची दिलेली आहे. वरीलप्रमाणे प्रबंधिकेत परिपूर्णता आणण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे.

* * *